जा२२१

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८ , माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माशि/१/कावि/५२६/२०१९
दि.०२/०६/२०१९

विषय :- "सहा.शिक्षक " पदावरील कर्मचा-यांच्या नियतकालीक बदल्यांबाबत..

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील माध्यमिक शिक्षण विभागातील सहा.शिक्षक यांच्या शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने त्यांच्या नावापुढे स्तभ ०६ मध्ये दर्शविलेल्या विद्यालयामध्ये बदलीने पदस्थापना देणेत येत आहे.

| अ.क्र. | शिक्षकांचे नाव | शैक्षणिक पात्रता | विषय | सध्याचे विद्यालय | बदलीचे विद्यालय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १) | श्री.अनिल रमेश जाधव | बी.ए.बी.एड | मराठी इतिहास | भोसरी | काळभोरनगर |
| २) | श्री.पाटील शोभा बाळासाहेब | एम.ए.बी.एड. | मराठी इतिहास | काळभोरनगर | भोसरी |
| ३) | श्री.केदार शंकर नारायण | बी.ए.बी.एड | मराठी भुगोल | पिंपरीनगर | भोसरी |
| ४) | श्रीम.शोभा बाळासाहेब भोसले | एम.ए.बी.एड | मराठी इतिहास | भोसरी | पिंपरीनगर |
| ५) | श्रीम.चव्हाण कविता अनिल | बी.ए.बी.एड | इंग्रजी भुगोल | पिंपळेसोदागर | पिंपळेगुरव |
| ६) | श्री.बंड नरेंद्र मच्छिंद्र | एम.ए.बी.एड | इंग्रजी भुगोल | खराळवाडी | पिंपळेसोदागर |
| ७) | श्री.डुंबरे विशाल बाळासाहेब | एम.ए.एम.एड | इंग्रजी भुगोल | पिंपळेगुरव | रूपीनगर |
| ८) | श्री.बंडलकर सागर अरूण | ए.टी.डी.बी.ए.ए.एम | चित्रकला | रूपीनगर | पिंपळेसौदागर |
| ९) | श्री.भिसे मधुकर रावसाहेब | ए.टी.डी | चित्रकला | पिंपळेसौदागर | रूपीनगर |
| १०) | श्रीम.खुडे निर्मला कैलास | बी.ए.बी.एड | इंग्रजी इतिहास | नेहरूनगर | पिंपळेसौदागर |
| ११) | श्री.शेलार वैशाली गिरीश | एम.ए.बी.एड | इंग्रजी इतिहास | पिंपळे सौदागर | नेहरूनगर |
| १२) | श्रीम.पवार वर्षा चंद्रकांत | ए.टी.डी | चित्रकला | खराळवाडी | काळभोरनगर |
| १३) | श्रीम.चव्हाण वैशाली दत्तात्रय | बी.ए.बी.एड | सर्व | काळभोरनगर | संततुकारानगर |
| १४) | श्री.राजेंद्र पुंजाहरी तुपे | एम.ए. बी.एड | चित्रकला | काळभोरनगर संततुकारामनगर | वाकड |
| १५) | श्रीम.कुलकर्णी उमा नारायण | ए.टी.डी | चित्रकला | वाकड | खराळवाडी/ संततुकारामनगर |

Scanned by CamScanner

उपरोक्त कर्मचा-यांस बदलीचे ठिकाणी रूजु होणेकामी या आदेशान्वये तात्काळ कार्यमुक्त (stand Released) करणेत येत असुन,त्यांनी बदली दिलेल्या विद्यालयात दि.०५/०८/२०१९ पर्यंत रूजु होऊन,रूजु अहवालाची एक प्रत माध्यमिक शिक्षण विभागाकडे पाठविण्याची दक्षता घ्यावी. उपरोक्त कर्मचा-यांनी आदेशाच्या दिनांकापासुन १५ दिवसाचे आत,लेखी स्वरूपात कार्यभार हस्तांतरण करावे व तसा अहवाल संबधित मुख्याध्यापकांनी द्यावा, अन्यथा सदर कर्मचारी हे प्रशासकीय कारवाईस पात्र राहतील याची त्यांनी नोंद घ्यावी.अ.क्र.१५ श्रीम.श्रीम.कुलकर्णी उमा नारायण यांनी सोमवार ते गुरवार ०४ दिवस खराळवाडी व शुक्रवार,शनिवार ०२ दिवस संततुकारामनगर येथे कामकाज करावे त्यांची अस्थापना मा.वि.खराळवाडी येथे ठेवणेत येत आहे.

बदलीच्या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरीता संबधित माध्यमिक विद्यालयांनी सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१) माध्यमिक विभागामार्फत करण्यात आलेल्या बदल्या ह्या सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व शैक्षणिक कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने बदलीने पदस्थापना करण्यात आलेल्या आहेत.

२) बदलीबाबतचे आदेश संबधीत विद्यालयांना पाठविण्यात येत असुन सर्व विद्यालयांनी पर्यायी कर्मचारी हजर होण्याची वाट न पाहता बदली झालेल्या कर्मचा-यांना तात्काळ आदेश बजाविणेत यावेत.सदरचे आदेश हेचकार्यमुक्तीचे असुन संबधीत विद्यालयांनी स्वत्रंत आदेश निर्गमीत करण्याची आवश्यकता नाही.

३) उपरोक्त कर्मचा-यांचे आदेशाचे दिनांकापर्यत गोपनीय अहवाल माध्यमिक शिक्षण विभागाकडे पाठविणेची संबधीत विद्यालयांनी दक्षता घ्यावी.

४) बदली करण्यात आलेल्या शिक्षकांनी नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ रूजु /हजर न झाल्यास,बदली आदेशाची अवमान केल्यास,प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे राजकीय दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्या गोपनीय अहवालात त्याबाबतची नोंद घेण्यात येईल,तसेच राजकीय दबावाबाबतची कृतीमहाराष्ट्र नागरी सेवा(वर्तणूक)नियम,१९७९ मधील नियम ३ (३) व २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे ती गैरवर्तणूक समजून त्यांच्याविरूध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल,याची स्पष्ट नोंद घेण्यात यावी.

५) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम,१९८१ मधील नियम ३० (सी) नुसार मुळ कार्यालयाने बदली झालेले कर्मचारी यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारू नये.असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबधित कर्मचारी त्यांच्या मुळ पत्यावर नोंदणीकृत देय डाकेने परत करावेत.

६) उपरोक्त नियतकालिन बदल्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे गरजेचे असल्यामुळे बदली झालेले सर्व कर्चाचा-यांचे माहे – ऑगस्ट – २०१९ पासून चे वेतन कोणत्याही परिस्थीतीत बदलीपुर्वीच्या विद्यालयातुन काढण्यात येउ नये.सदर वेतन संबधित कर्मचारी बदलीच्या विद्यालयात हजर झाल्यानंतर बदली नंतरच्या विद्यालयाने काढावे व तसा अहवाल माध्यमिक विभागास सादर करावा,तसेच उपरोक्त कालावधितील वेतन बदलीपुर्वी कार्यरत असलेल्या विद्यालयातुन आहरण मुख्याध्यापकांनी अदा केल्यास त्यांना व्यक्तीश: जबाबदार धरणेत येवून त्यांचे वर नियमाधिन कारवाई करणेत येईल अशा सुचना सर्व विद्यालयांना देणेत येत असुन लेखाविभागाने वेतन बिलांची अदायगी करताना तशी दक्षता घ्यावी.

( श्रावण हर्डीकर )
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८

प्रति,सर्व संबधित कर्मचारी
प्रति,
१)लेखा विभाग
२)प्रशासन विभाग टेबल क्र.२२, संगणक कक्ष
३)पिं.चिं. मनपा कर्मचारी महासंघ
४)पिं.चिं. माध्यमिक शिक्षकांची पतसंस्था
५) संबधित विद्यालये

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

Scanned by CamScanner